मॉडर्न हायस्कूल - कॉलेज

prof. masalkar
Kindly display on college notice board website
and also on every class
pl see that it is notified to all students & teachers
should bring it to

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
मध्यवर्ती पासविभाग कार्यालय
दिनांक १३/०७/२०२३
30/08/2023

आगार व्यवस्थापक,

............................आगार

विषय:--पुणे व पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील व उपनगरातील सरकारमान्य व खाजगी शाळा/महाविद्यालय/इन्स्टीटयुट यांना महामंडळामार्फत अनुदानीत पासेसबाबत.

संदर्भ:— मा. सह व्यवस्थापकीय संचालक यांची दि०९/०८/२०२३ रोजीची मान्य टिपणी.

पुणे व पिंपरी चिंचवड मनपाचे शाळेतील इयत्ता ५ वी ते १२ वी चे विद्यार्थ्यांना सन २०२३ २०२४ या शैक्षणिक वर्षा करीता १००% अनुदानीत मोफत बस प्रवास पास व पुणे मनपा हद्दीतील खाजगी शाळेतील इयत्ता ५ वी ते १० वी चे विद्यार्थ्यांकरीता ७५% सवलतीचे अनुदानीत बस प्रवास पासेसचे वितरण करणेत येत असून त्याबाबतची कार्यवाही आपले डेपो स्तरावर सुरू असून त्याबाबतही पाठपुरावा करावा.

तथापि या व्यतीरीक्त पुणे व पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत व उपनगरामध्ये अनेक सरकारमान्य तसेच खाजगी शैक्षणीक संस्था, शाळा/महाविद्यालय/इन्स्टीटयुट असून अशा संस्थामधून विद्यार्थी विविध प्रकारचे शिक्षण (कोर्सेस) घेत असून सदरचा शिक्षणाचा कालावधी १ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी मुदतीचे असतात. अशा संस्थानी यावर्षी सन २०२३—२४ मध्ये बहुसंख्य सरकारमान्य व खाजगी शैक्षणीक संस्थानी विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे सवलतीचे पास मिळावेत अशी मागणी परिवहन महामंडळास केलेली आहे. त्याअनुषंगाने खालील नमूद तक्त्यातील सवलतीचे विद्यार्थी पासेस परिवहन महामंडळाचे विविध पास केंद्रांवरून नियमानुसार वितरीत केले जात असून यावर्षी काही नविन शाळा/महाविद्यालय/इन्स्टीटयुटचे यांचे मागणीनुसार या संस्थांच्या विद्यार्थ्यांना पासेस वितरण केल्यास महामंडळाच्या उत्पन्नात वाढ होणेस मदत होईल.

मा. अध्यक्ष व व्यवस्थपकीय संचालक यांनी महामंडळाचे उत्पन्न वाढविणेचे दृष्टीने आदेशीत केल्याप्रमाणे आगार स्तरावर आपले नजिकचे शाळा/महाविद्यालय/इन्स्टीटयुटचे प्राचार्य, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व विद्यार्थी यांना स्वत: भेट देवून विद्यार्थी पासेस बाबत (मार्गदर्शन) माहिती दयावी जेणे करून महामंडळाकडील प्रवासी वाढून उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. विद्यार्थी पासेस करीता लागणारी माहिती खालीलप्रमाणे :—

| अ.क्र | पसेस प्रकार | रक्कम रू. | पासेसकरीता आवश्यक कागद पत्रे |
|---|---|---|---|
| १ | विद्यार्थी मासिक पास (सर्व मार्गासाठी) | ७५०/— | १) महामंडळाकडील विहित नमुन्यातील अर्ज (शुल्क रू.५/—) |
| २ | विद्यार्थी वार्षिक पास (सर्व मार्गासाठी) | ५०००/— | २) सदर अर्जावर संबंधीत कॉलेज/शाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांची सही व शिक्का |
| ३ | विद्यार्थी सहामाही पास (सर्व मार्गासाठी) | ३०००/— | ३) चालू शैक्षणिक वर्षाची फि पावती किंवा बोनाफाईड सर्टिफिकेट |
| ४ | विद्यार्थी त्रैमासिक पास (सर्व मार्गासाठी) | २०००/— | ४) आधारकार्डाची छायांकित प्रत |
| ५ | विद्यार्थी पंचींग पास (ट्रिप्लिकेट) प्रवास अंतरानुसार | अंतरानुसार दर आकारणी (५०% सवलत) | ५) पासपोर्टसाईज २ फोटो<br>६) महामंडळाकडील ओळखपत्र (शुल्क रू २०/—)<br>७) रहिवासी पुराव्याकरीता लाईट बिल, रेशनिंग कार्ड इत्यादी |

वरील नमूद पासेस हे वरील कागदपत्रांची पुर्तता केल्यावर विद्यार्थ्यांचे सोयीनुसार परिवहन महामंडळाचे नजिकचे पास केंद्रावरून देण्यात येतील. तसेच याबाबतचा अहवाल वाहतूक व्यवस्थापक कार्यालयास सादर करावा.

चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.